# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक – ४२२ ००४. Mhasrul, Dindori Road, Nashik - 422 004.
**E-mail : coe@muhsnashik.com** **Website: www.muhsnashik.com**

डॉ. उदयसिंह रावराणे (एम.डी.)
**परीक्षा नियंत्रक**
Phone : **0253 - 2539 250, 2539 226**
Fax : **0253 - 2531 836, 2539 222, 223**

जावक क्र. मआविवि/एक्सए/६३७४/२०११ दि.०६/०९/२०११

## परीपत्रक

प्रति,
मा. अधिष्ठाता / प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,

विषय : विद्यापीठाच्या परिक्षांसाठी बॅकेत स्वतंत्र खाते उघडण्यासंदर्भात.
संदर्भ : मा. व्यवस्थापन परीषद ठराव क्र. २१७ / २०११ दि. २२.०८.२०११.

महोदय / महोदया,

विद्यापीठातर्फे महाविद्यालयांना विविध कामांसाठी अग्रीमांच्या रक्कमा / प्रदाने वेळोवेळी दिली जातात. ही प्रदाने सुलभरीत्या व तातडीने व्हावी यासाठी ई – बॅकींगद्वारे सदर प्रदाने आपल्या महाविद्यालयाच्या बॅंक खात्यामध्ये थेट भरणा करण्यात येत आहे. परीक्षा अग्रीमाच्या हिशेबासाठी एकच विहीत नमुना व विविध प्रदानांसाठी नियमावली तसेच सुस्पष्ट सुचना यामुळे महाविद्यालयांनाही परीक्षेसंबधीच्या प्रदानांचा हिशेब ठेवणे व विद्यापीठास वेळेवर सादर करणे यातील अडचणी कमी होऊन सुसूत्रतता निर्माण करता आली आहे. मात्र सदर कार्यवाही करीत असतांना काही बाबी/त्रुटी लक्षात आल्या आहेत. यासर्व अडचणी/त्रुटी वेळोवेळी संपर्क करुन परस्पर सहकार्याने सोडविण्यात येत आहेत. मात्र तरीही महाविद्यालयांचे परीक्षा व इतर अग्रीम, शैक्षणिक शुल्क, इतर रक्कमा इ. सर्व व्यवहार एकाच बॅंक खात्यामध्ये होत असल्याने खात्यात जमा होणाऱ्या विविध रक्कमांबाबत संभ्रम निर्माण होतो व त्यामुळे परीक्षा अग्रीमांच्या समायोजनास अडचणी येतात असे निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने सदर कामात सुसूत्रतता यावी तसेच अग्रीमांची प्रदाने व परतावा / वसुली करतांना जलद कार्यवाही व्हावी, तसेच महाविद्यालयांना हिशेब ठेवण्यास व व्यवहार करण्यास, अग्रीमांचे समायोजन करणे सोपे व्हावे यासाठी आपल्या महाविद्यालय स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले आहे.

१) सर्व महाविद्यालयांनी आपआपल्या महाविद्यालयात फक्त परीक्षेसंबंधी प्रशासन तसेच वित्त व लेखा विषयक **( Finance and Administration of Conduct of Examination )** कामे पाहण्यासाठी एका स्वतंत्र विद्यापीठ परीक्षा समन्वयकाची **( University Examination Co–Ordinator )** नियुक्ती करावी. या पदावर महाविद्यालयात कार्यरत असलेल्या वरीष्ठ शिक्षकांची नियुक्ती करावी. हे पद सेंटर इन्चार्ज व कॅप कस्टोडियन यापेक्षा वेगळे असुन अधिष्ठाता / प्राचार्यांनी सदर पदावर या दोघांपेक्षा वेगळया एका वरिष्ठ शिक्षकाची नियुक्ती करावी.

२) सदर विद्यापीठ परीक्षा समन्वयकांनी उन्हाळी व हिवाळी सत्रातील लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा तसेच केंद्रीय मुल्यमापन कार्यक्रम असल्यास या परीक्षांसंबंधित प्रशासकीय तसेच वित्त व लेखा विषयक सर्व कामांचे नियोजन व पर्यवेक्षण **( Planning & Supervision )** करावयाचे आहे. तसेच महाविद्यालयातील लेखापाल व लिपिक यांच्या सहकार्याने व विहित केलेल्या पध्दतीने वेळेत पुर्ण करावयाची आहेत. या कामासाठी समन्वयकाला रु.१०००/- प्रती परीक्षा मानधन अदा करण्यात येणार आहे.

३) ई-बॅकींग द्वारे व्यवहार करण्यास सोपे व्हावे यासाठी सर्व महाविद्यालयांनी कोअर बॅकींग / आर टी जी एस सुविधा असलेल्या राष्ट्रीयीकृत बॅकेतच स्वतंत्र परीक्षा खाते उघडावे. सदर खाते महाविद्यालयाचे नाव व परीक्षा खाते या नावाप्रमाणेच उघडावे. सदर खात्याच्या नावात याव्यतिरीक्त संस्थेचे किंवा शहराचे नाव किंवा प्राचार्य / संचालक असा इतर कुठलाही तपशील लिहु नये. महाविद्यालयाच्या नावातच व्यक्तीचे नाव किंवा शहराचे नाव असल्यास सदर नाव टाकण्यास हरकत नाही मात्र याव्यतिरिक्त इतर तपशील किंवा इतर नावाने खाते उघडु नये. पुढे प्रत्येक विद्याशाखेतील एक उदाहरण दिलेले आहे.

| महाविद्यालयाचे नाव | बॅंक खात्याचे नाव |
|---|---|
| MAEER MIT's MIMER Medical College | MIMER Medical College, Examination A/C |
| T.P.C.T.'s Terna Dental College & Hospital | Terna Dental College, Examination A/C |
| Shree N.K.D. Charitable Trust's Nallasopara Ayurved Medical College | Nallasopara Ayurved Medical College, Examination A/C |
| P.D.Jain Homoepathic Medical College & Hospital, Parbhani | P.D.Jain Homoepathic Medical College, Examination A/C |
| College of Nursing, Govt. Medical College, Nagpur | GMC College of Nursing, Examination A/C |

४) विद्यापीठ परीक्षेसाठी उघडलेल्या सदर बॅक खात्याचे परीचालन ( Operation ) महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य व परीक्षा समन्वयक या दोघांच्या संयुक्त स्वाक्षरीने करण्यात यावे. कुठल्याही परीस्थितीत या व्यतिरिक्त इतर व्यक्तीद्वारे किंवा एका स्वाक्षरीने सदर खात्याचे परीचालन करण्यात येऊ नये. सदर खाते उघडण्यासाठी प्रारंभीक रक्कम ( Minimum Balance ) महाविद्यालयाने भरावयाची आहे. सदर रक्कम खात्यामध्ये कायम शिल्लक ठेवणे अपेक्षित आहे. सदर खात्यामध्ये विद्यापीठाकडुन प्राप्त झालेला परीक्षेसंबंधी अग्रीम जमा करणे व परिक्षासंबंधीत खर्चाव्यतिरिक्त इतर कोणतेही व्यवहार करण्यात येऊ नये.

५) महाविद्यालयातील परीक्षेसंबंधी वित्त व लेखाविषयक बार्बीमध्ये माहीती हवी असल्यास विद्यापीठाकडुन आवश्यकतेप्रमाणे सदर परीक्षा समन्वयकांशी संपर्क करण्यात येईल. यासाठी त्यांचे नाव, पत्रव्यवहारासाठी पत्ता, कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक, मोबाइल क्रमांक व ई-मेल इत्यादी तपशील तसेच उपरोक्त सुचनेप्रमाणे उघडलेल्या नवीन परीक्षा खात्याचे नाव व आर टी जी एस क्रमांकासह इतर तपशील सोबत जोडलेल्या नमुन्यात परीक्षा विभागास दि. ३० सप्टेंबर २०११ पर्यत प्राधान्यक्रमाने कळवावा ही विनंती.

आपणास अधिक चांगली सेवा देण्यासाठी उपरोक्त कार्यवाही बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

धन्यवाद !

परीक्षा नियंत्रक

सोबत : माहितीचा नमुना

# <u>College letter Head</u>

To,
Controller of Examinations,
Maharashtra University of Health Sciences,
Vani – Dindori Road, Mhasrul,
Nashik – 422 004.

Sub : Information of Examination Co–Ordinater & Bank Account

Ref : MUHS / XA / 6136 / 2011 Dated : 23 / 08 / 2011

Sir,

Please find Information of Newly appointed Examination Co–Ordinater & details of Bank Account, as desired by you

<table>
<tr><td>Sr. No.</td><td>Particulars</td><td colspan="2">Details</td></tr>
<tr><td>1</td><td>Name of the Newly appointed Examination Co–Ordinater</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td rowspan="3">2</td><td rowspan="3">Contact details<br>( with STD Code )</td><td>Mobile No.</td><td></td></tr>
<tr><td>Office Phone No.</td><td></td></tr>
<tr><td>E- Mail Address</td><td></td></tr>
<tr><td rowspan="4">3</td><td rowspan="4">Correspondence Address of Examination Co–Ordinater</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td colspan="2"></td></tr>
<tr><td colspan="2"></td></tr>
<tr><td colspan="2"></td></tr>
<tr><td colspan="4">Details of Examination Bank Account<br>( opened exclusive for University examination purpose )</td></tr>
<tr><td>4</td><td>Name of the Bank</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>5</td><td>Branch Name</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>6</td><td>Account Name</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>7</td><td>I. F. S. Code</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>8</td><td>C B S A/C No.</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>9</td><td>M I C R No.</td><td colspan="2"></td></tr>
</table>

Yours

Dean / Principal